**जिल्हा परिषद, गडचिरोली**

**शिक्षण विभाग (प्राथमिक)**

Email:-eoprygadchiroli@gmail.com


जा.क्र. /जिपग/शिविप्रा/कविअ/टीईटी प्रमा./ 4014 /2026.     दिनांक:- 18 / 05 /2026

# * प्रेस नोट *

महाराष्ट्र शिक्षक पात्रता परिक्षा दिनांक 23.11.2025 रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर परिक्षेचे पेपर क्र. 1 व पेपर क्र. 2 चा अंतिम निकाल दिनांक 03.02.2026 रोजी महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने प्रसिध्द करण्यात आले होते. सदर परिक्षेत पात्र उमेदवारांची पात्रता प्रमाणपत्र शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद गडचिरोली कार्यालयास प्राप्त झाले असून सदर प्रमाणपत्र उचल करण्यास संबधित उमेदवारांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद गडचिरोली कार्यालयास महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा प्रवेश पत्र प्रत, महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा गुणपत्रिका प्रत, डी.एड. अथवा बी.एड. प्रमाणपत्र किंवा गुणपत्रक प्रत, आरक्षण प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र प्रत, दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र प्रत, माजी सैनिक असल्यास त्याबाबतचा पुरावा, ओळखपत्र (आधार कार्ड, पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, निवडणूक ओळखपत्र इ.) सदर प्रमाणपत्राच्या मुळ प्रती व त्यांचे छायांकीत प्रतीचा एक संच सोबत आणावे. सदर मुळ प्रमाणपत्र तपासणी अंती अनियमितता अथवा प्रमाणपत्र खोटे असल्याचे आढळून आल्यास अथवा कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यास याबाबत मा. आयुक्त, महाराष्ट्र राज्य, परीक्षा परिषद पुणे यांचेकडे प्रकरण सादर करुन त्यांनी दिलेल्या अंतिम निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(बाबासाहेब पवार)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, गडचिरोली

**प्रति,**
मा. संपादक,
दैनिक ----------------------------------.

वरील वृत्त आपल्या वर्तमानपत्रात निशुल्क प्रसिध्द करुन सहकार्य करावे, ही विनंती.